NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २६.१०.२०२६ सोमवार

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे अजनी :–शस्त्र बाळणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २६.१०.२०२६ चे ०४.४० वा. चे सुमारास, अजनी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, वंजारी नगर पुलाचे खाली, केंद्रीय विद्यालयाजवळ एक इसम शस्त्रासह फिरत असुन त्याने अंगात पांढरा फुलशर्ट व जिन्स पॅन्ट घातलेली आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी गेले असता, प्राप्त वर्णनाचा इसम दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अंकित उर्फ प्रणय राजकुमार देशमुख वय २७ वर्षे, रा. भिमवाडी, भगतनगर, राजु धुर्वेच्या घरी किरायाने पिवळी नदी, यशोधरानगर, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात प्लास्टीक व स्टीलची मुठ असलेला एक लोखंडी धारदार कोयता किंमती ५००/–रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने धारदार कोयता बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा शालिराम शेंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे खापरखेडा :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २५.१०.२०२६ चे ११.०० ते ११.३० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे नातेवाईक नामे रविंद्र मनोहरराव वलोकर वय ५८ वर्षे रा. वार्ड क्र. ०२, श्याम मंगल कार्यालय जवळ, खापरखेडा, नागपुर हे त्यांचे दुचाकी ॲक्टिवा गाडी क्र. एम.एच. सीवाय ४८९५ ने किल्ले कोलार येथुन खापरखेडा येथे येत असतांना, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत, मौदा नांदा शिवार, वाय पॉईन्ट येथे रोडवर ट्रक क्र. एमएच ४९ एटी ९४८२ चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे नातेवाईकांचे दुचाकीला मागुन धडक दिल्याने, ते गाडीसह खाली रोडवर पडुन डोक्याला मार लागुन गंभीर जखमी होऊन मरण पावले.

याप्रकरणी फिर्यादी सुरेश आनंदराव वलोकर वय ६७ वर्षे रा. वार्ड क्र. ०२, श्याम मंगल कार्यालय जवळ, खापरखेडा, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे सपोनि विलास करंगामी ९७६६३७८४८२ यांनी आरोपी ट्रक चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे तहसील :– कारची काच फोडुन चोरी करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी पराग अशोक शेंडे वय ३२ वर्ष रा. प्लॉट क्र. ३, जुआरे ले आऊट, टिचर्स कॉलनी, ब्राम्हणी, बल्लारशाह, जि. चंद्रपुर हे त्यांची मारुती सुजुकी कार क्र. एमएच ३४ सीजे २४१८ ने पोलीस ठाणे तहसील

हद्दीतील सीए रोडवरील रोकडे बंधु दुकानात लग्नाचे कपडे घेण्याकरीता आले होते. कारमध्ये त्यांनी काळया रंगाचे बॅगमध्ये रोख १,०७,०००/– रु, तसेच वेगवेगळया बॅकेंचे एटीएम कार्ड व रेडमी कंपनीचा टॅब कि. २५,००० रु. चा असा एकुण १,३२,०००/– रु. चा मुद्येमाल ठेवलेला होता. कार रोकडे दुकानाजवळील रोडवर लॉक व पार्क करुन ते दुकानात गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे कारची काच फोडून नुकसान करुन, कारमधील वर नमुद मुद्येमाल चोरुन नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. सुरज सिरसाठ ९८९०००० ८२६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३२४(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे कळमणा :– फिर्यादी नितेश सिताराम कावळे वय ३८ वर्षे, रा. काली माता मंदीरजवळ, नाका क्र. ०४, कळमणा, नागपूर यांनी पोलीस ठाण कळमणा येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. भाग्यश्री नितेश कावळे वय २६ वर्षे, ह्या त्यांची मुले १) शुभम वय ०७ वर्ष व २) काव्या वय ०४ वर्ष यांचेसह दिनांक २१.१०.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे कळमणा हद्दीतील राहते घरुन बेपत्ता झाल्या आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाहीत. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **भाग्यश्री यांचे वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–५ फुट, केस–काळे लांब, अंगात–हिरव्या रंगाचा सुलवार सुट घातलेला आहे. भाषा–हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह–डावे हातावर भाग्यश्री असे गोंदलेले आहे. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमणा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



सौ. भाग्यश्री शुभम काव्या

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ८, रुम क्र. २२०, नागपुर.	१९९९/२०१५	कलम २९४ भा.दं.वि.	संदीप नारायणराव कुंभारे रा. लालगंज, झाडे चौक, प्रमोद किराणा दुकानासमोर, नागपुर.	२८.१०.२०२६
२.	मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ८, रुम क्र. २२०,	१२५९/२०१३	कलम २९४ भा.दं.वि.	राजेश नारायणराव मुदलीयार रा. श्री साई अपार्टमेंट, फ्लॅट क्र. २०५, बेसा रोड, नागपुर.	२९.१०.२०२६

	नागपुर.				
३	मा. १८ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	२५१/२०१८	कलम २७९, ३३७,३३८ भा.दं.वि.	१) कुणाल दिनदयाल बरमैया वय ३४ वर्ष रा. ३१२, नवीन बगडगंज, नागपुर.	०४.११.२०२६

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

वाहतुक शाखा प्रेसनोट

नागपूर शहरातील गांधीबाग, इतवारी, कळमना, सिताबर्डी तसेच शहरातील इतर सर्व प्रमुख बाजारपेठ व व्यापारी परिसर येथे मालवाहू वाहने, ट्रान्सपोर्ट वाहने, व्यावसायिक वाहने अथवा माल वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या इतर वाहनांमधून माल चढविणे अथवा उतरविणे (Loading / Unloading) हे दुपारी १४.०० ते रात्री २०.०० वाजेपर्यंत पूर्णत: प्रतिबंधित करून होणाऱ्या वाहतूक कोंडीवर नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक सुरक्षितता, वाहतुकीची सुरळीत व सुरक्षित हालचाल, वाहतूक कोंडी टाळणे आणि नागरिकांची गैरसोय कमी करणे या दृष्टीकोनातुन अधिसुचना काढणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

- वाहनामधून माल चढविणे व उतरविण्यास तात्पुरता प्रतिबंध :— नागपूर शहरातील गांधीबाग, ईतवारी, कळमना, सिताबर्डी, तसेच शहरातील इतर सर्व प्रमुख बाजारपेठा व व्यापारी परिसर येथे मालवाहू वाहने, ट्रान्सपोर्ट वाहने, व्यावसायिक वाहने अथवा माल वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या इतर वाहनांमधून माल चढविणे अथवा उतरविणे (Loading/Unloading) पूर्णत: प्रतिबंधित राहील. या दरम्यान रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला, सर्व्हिस रोडवर, बाजारपेठेच्या प्रवेश मार्गावर किंवा वाहतुकीच्या प्रवाहास अडथळा निर्माण होईल अशा कोणत्याही ठिकाणी दुपारी १४.०० ते रात्री २०. ०० वाजे पर्यंत माल चढविणे अथवा उतरविणे असे कार्य करता येणार नाही. दिलेल्या नमूद कालावधीत माल चढविणे व उतरविण्यास प्रतिबंध राहील.
- निर्बंध लागू असलेले क्षेत्र :—
  १. गांधीबाग बाजार परिसर
  २. ईतवारी बाजार परिसर
  ३. कळमना बाजार बाहेरील परिसर
  ४. सिताबर्डी बाजार परिसर

तसेच नागपूर शहरातील इतर सर्व प्रमुख बाजारपेठ, व्यापारी परिसर व गर्दीची ठिकाणे, ज्या ठिकाणी माल चढविणे अथवा उतरविण्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो किंवा वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते.

- **अत्यावश्यक सेवा** :– रुग्णवाहिका, अग्निशमन, पोलीस वाहने तसेच इतर आपत्कालीन सेवेसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांना, आपत्कालीन परिस्थितीत कार्यरत असताना, सदर निर्बंधातून आवश्यक ती सूट राहील.

सदर अधिसूचना दिनांक २७.१०.२०२६ ते दिनांक २६.११.२०२६ पर्यंत अंमलात राहील.

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/–
(आदित्य मिरखेलकर, भापोसे)
पोलीस उप आयुक्त, वाहतूक,
नागपूर शहर